दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार , 05 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 143 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

# ना. पंकजाताई मुंडे यांनी दुष्काळ पाहणी दौऱ्यात शेतकऱ्यांना दिला धीर

## राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा ; उद्या वडवणी, धारूर, माजलगांव, गेवराईत पाहणी करणार

■ बीड प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज बीड व पाटोदा तालुक्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतातील नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला. खचून जाऊ नका, सरकार खंबीरपणे आपल्या पाठिशी उभा आहे अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला.

बीड जिल्ह्यात सध्या दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे. मागील आठवड्यात परळी, अंबाजोगाई, केज तालुक्याचा दौरा केल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी आज बीड तालुक्यातील काकडहिरा, मूर्शदपूर, वंजारवाडी व पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी, रोहतवाडी, थेरला, जवळाला, तांबा राजूरी आदी ठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकाच्या नुकसानीची पाहणी केली. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, विजय गोल्हार, योगेश क्षीरसागर, सर्जेराव तांदळे, सलीम जहांगीर, अशोक लोढा, अनुरथ सानप, मधुकर गर्जे, सुधीर घुमरे, सुवर्णा लांबरूड आदी यावेळी उपस्थित होते. सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरी यात झळ पोहोचलेल्या शेतकऱ्यांना धीर देण्याची गरज आहे. यासाठी मी प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी करत आहे, पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून मदतीचा प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत असे त्या म्हणाल्या.आम्ही दर मंगळवारी होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळाचा आढावा घेत असतो, काय उपाययोजना करता येतील याची चर्चा करत असतो. परवाच्या बैठकीतही यावर चर्चा होणार आहे असे त्या म्हणाल्या.

### सरकार संवेदनशीलपणे काम करत आहे

■ दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे, याची सरकारला जाणीव आहे. सरकार यात संवेदनशील काम करत असल्यामुळेच एवढ्या लवकर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळातील प्रत्येक गोष्ट सरकार गंभीरपणे घेत आहे. सध्या तरी पशुधनाला पुरेल इतका चारा जिल्ह्यात उपलब्ध आहे, तथापि, कमी पडल्यास जिथे दुष्काळ नाही तेथून चारा उपलब्ध करून देऊ असं सांगत बळीराजाने खचून जाऊ नये, सरकार आवश्यक ती सर्व पावले उचलत आहे असं ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

### उद्या वडवणी, धारूर, माजलगांव, गेवराईत पाहणी

■ ना. पंकजाताई मुंडे उद्या सोमवारी (ता.०५) दुपारी २ ते ६ वा. दरम्यान मोरवड, पुसरा (वडवणी), तेलगाव (धारूर), नित्रुड, पात्रुड, हरकी लिमगाव (माजलगांव), मारफळा तांडा, अर्धमसला (गेवराई) आदी ठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करणार असल्याचे त्यांच्या संपर्क कार्यालयातून सांगण्यात आले.



# बीड शहरातील रस्त्याचे काम संथ गतीने ; ना . पंकजाताई मुंडेंनी घेतला समाचार

## काम जलदगतीने पूर्ण करण्याचे नॅशनल हायवे च्या अधिकाऱ्यांना निर्देश रुग्णवाहिकांच्या मार्गातील अडथळा दूर करण्याच्याही दिल्या सूचना

■ बीड प्रतिनिधी

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका या अडीच किलोमीटरच्या सिमेंट रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने होत असल्याच्या कारणावरून राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज नॅशनल हाय वे च्या अधिकाऱ्यांचा चांगलाच समाचार घेतला. हे काम जलदगतीने पूर्ण करावे असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. यासोबतच रुग्णवाहिकांच्या मार्गातील अडथळा दूर करण्याच्याही सूचनाही त्यांनी दिल्या

शहरातील महत्वाकांक्षी सिमेंट रस्त्याच्या कामा संदर्भात स्थानिक वर्तमानपत्रात आलेल्या बातमीची दखल घेत ना. पंकजाताई मुंडे यांनी नॅशनल हाय वे कार्यकारी अभियंता उबाळे यांना संपर्क साधून याविषयी जाब विचारला. कोणत्याही परिस्थितीत हे काम जलदगतीने झाले पाहिजे असं त्यांनी निःक्षून सांगितलं.



### रूग्णवाहिकेचा अडथळा दूर करा

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका या बार्शी रोडवरील राष्ट्रीय महामार्गाच्या रस्ता रुंदीकरणाचे आणि नालीचे काम सध्या सुरू आहे. हे काम चालू असताना रस्त्याच्या मधोमध एकसलग दुभाजक बसवण्यात आले आहे. वास्तविक पाहता, यापूर्वी जिल्हा रुग्णालयासमोर दुभाजक नव्हते, ज्यामुळे बार्शी रोडवरून येणाऱ्या रुग्णवाहिका आणि इतर वाहने थेट रुग्णालयात प्रवेश करू शकत होती. रस्त्याचे काम सुरू झाल्यापासून पूर्वीप्रमाणेच केवळ रुग्णवाहिका आणि रुग्णालयात येणाऱ्या वाहनांसाठी येथे प्रवेशाची व्यवस्था असावी, अशी आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांकडून सातत्याने केली जात होती. गंभीर रुग्णांना घेऊन येणाऱ्या रुग्णवाहिकांना अर्धा ते एक किलोमीटरचा फेरा मारून रुग्णालयात पोहोचावे लागत होते. याची दखल घेऊन ना. पंकजाताई मुंडे यांनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांशी संपर्क साधला आणि रुग्णांच्या हितासाठी तातडीने दुभाजक हटवून रुग्णवाहिकांना थेट प्रवेश उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

# आष्टी पोलीस ठाण्यातील "त्या" दोन हवालदारांवर कारवाई करा : सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष काकडे यांचे थेट पोलीस अधीक्षकांना पत्र

■ आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी पोलीस ठाण्यांतर्गत असणाऱ्या डोईठाण बीटमधील पोलीस हवालदार संदीप सानप आणि हवालदार सतिष मुंडे यांच्या गैरकारभारा विरोधात सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्रने आक्रमक भूमिका घेतली आहे. या दोन्ही कर्मचाऱ्यांचे अवैध धंदेवाल्यांशी साटेलोटे असून त्यांच्यावर तातडीने निलंबन व बदलीची कारवाई करावी, अशी मागणी सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी थेट बीडच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हवालदार संदीप सानप आणि हवालदार सतिष मुंडे हे गेल्या अनेक दिवसांपासून डोईठाण बीटचा कारभार पाहत आहेत.मात्र,त्यांचे परिसरातील अवैध धंदे चालवणाऱ्यां सोबत उघड लागेबांधे आहेत. यामुळे डोईठाण बीट परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे फोफावले असून तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनतेच्या गर्तेत ढकलली जात आहे.

या बीट परिसरातील नागरिकांनी पोलीस ठाण्यात काही तक्रार अर्ज दिल्यास,ते अर्ज या दोन हवालदारांकडे चौकशीसाठी जातात.



सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र

Email- sarpanchparishadmh@gmail.com

महाराष्ट्र राज्य मुंबई 2019 जी.बी.बी. एस. डी. नोंदणी क्र 1721/2019

जा. क्र स.प.मुं. म./333/2026 दिनांक -03/10/2026

प्रती,
मा. जिल्हा पोलीस अधिक्षक
बीड

विषय- पोलीस स्टेशन आष्टी जि. बीड येथील पोलीस हवालदार संदिप सानप आणि पोलीस हवालदार सतिष मुंडे यांच्यावर कारवाई करणे बाबत.

महोदय,

वरील विषयी आपणास विनंती की, आष्टी पोलीस स्टेशन अंतर्गत डोईठाण बीट मधील हवालदार संदिप सानप आणि हवालदार सतिष मुंडे हे गेल्या अनेक दिवसा पासून या बीटचे काम पाहतात. मात्र या दोघांचे अवैध धंद्यावाल्याशी लागेबांधे आहेत. यामुळे या बीट मध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरु असून तरूण पिढी व्यसनाधिन झाली आहे तसेच या बीट मधील कुणी पोलीस स्टेशनला तक्रारी अर्ज दिला तर तो अर्ज पोलीस स्टेशन मधुन यांना मार्क करून दिल्यावर ज्यांच्या विरूध्द अर्ज आहे त्यांच्याकडून पैसे उकळण्याचे काम करतात मात्र या अर्जावर कुठलीही कारवाई होत नसुन असे अनेक अर्ज यांच्याकडे प्रलंबीत आहेत. या सर्व अर्जाची यांनी का चौकशी केली नाही व निकाली काढले नाहीत याची चौकशी करण्यात यावी.

तसेच अवैध धंदे करणाऱ्यावर पोलीसांनी या पुर्वी ज्या कारवाई केल्या त्यांच्या हे सारखे संपर्कात असतांत त्यांच्याकडे जाउन जेवण करणे त्यांच्याकडून हप्ते वसूल करणे या बाबी सर्रास सुरु आहेत त्यामुळे या दोघांचे मोबाईल कॉल तपासणे गरजेचे आहे या दोघांचे वागणे हे पोलीस खात्याला काळीमा फासणारे असून आष्टी पोलीस स्टेशनचे तत्कालीन पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या काळातील अर्जाचा यांनी तपास केलेला नाही त्यामुळे या दोघांवर कारवाई करून यांची पोलीस नियंत्रण कक्षात बदली करून यांच्यावर कायदेशिर कारवाई करावी ही विनंती.

आपला स्नेहांकीत

दत्ता काकडे

प्रदेशाध्यक्ष, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र

प्रदेश कार्यालय- 8/9 वासवानी नगर,292 कोरेगाव पार्क, लेन नं. पुणे 411001मो. नं. 9423168055/9823797770
राज्य मध्यवर्ती कार्यालय- काकडे पाटीलस्कुल अवार माऊलीनगर आष्टी ता. आष्टी जि बीड

मात्र, तक्रारींवर निष्पक्ष चौकशी करून कारवाई करण्याऐवजी, ज्यांच्या विरोधात अर्ज आहे त्यांच्याकडूनच पैसे उकळण्याचे काम हे हवालदार करतात,असा थेट आरोप निवेदनात करण्यात आला आहे.यामुळे सर्वसामान्य जनतेचे अनेक तक्रार अर्ज गेल्या कित्येक दिवसांपासून प्रलंबित आहेत. आष्टी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या काळातील अर्जांचाही या हवालदारांनी अद्याप तपास केलेला नाही. या सर्व प्रलंबित अर्जांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वी पोलिसांनी ज्या अवैध धंदे चालवणाऱ्यांवर कारवाया केल्या होत्या, त्यांच्याशीही या दोघांचे नियमित संबंध आहेत. त्यांच्याकडे जाऊन जेवणावळी झोडणे आणि त्यांच्याकडून नियमित हप्ते गोळा करणे यासारखे प्रकार सर्रास सुरू असल्याचे समोर आले आहे. पोलिसांच्या या वर्तनामुळे पोलीस खात्याची प्रतिमा मलिन होत असून संपूर्ण खात्याला काळिमा फासली जात आहे अशी संतप्त भावना व्यक्त होत आहे.

या दोन्ही हवालदारांचे अवैध धंदेवाल्यांशी असणारे लागेबांधे उघडकीस आणण्यासाठी त्यांचे मोबाईल कॉल रेकॉर्ड तपासणे अत्यंत गरजेचे असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.पोलीस खात्याची प्रतिमा जपण्यासाठी आणि डोईठाण परिसरातील अवैध धंद्यांना चाप लावण्यासाठी हवालदार संदीप सानप आणि हवालदार सतिष मुंडे यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करून त्यांची पोलीस नियंत्रण कक्षात रवानगी करण्यात यावी अशी जोरदार मागणी सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी केली आहे.

# अंबाजोगाई घरफोडीचा पर्दाफाश! तिसऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या; 18 तोळे सोने अन् 743 ग्रॅम चांदी जप्त

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील बंद घर फोडून 53 तोळे सोन्याचे दागिने, पावणेदोन किलो चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा मोठा मुद्देमाल लंपास करणाऱ्या टोळीतील पाहिजे आरोपीच्या स्थानिक गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी आरोपी मंगलसिंग हिरासिंग बावरी (वय 22, रा. शिवाजी चौक, परळी, जि. बीड) यास परळी रेल्वे पुलाजवळ सापळा रचून ताब्यात घेतले. त्याच्याकडून 18 तोळे (187.430 ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि 743 ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने (विट) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे अंबाजोगाई घरफोडी प्रकरणात आतापर्यंत 45 तोळे सोन्याचे दागिने आणि 1601 ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

अंबाजोगाई येथील एक कुटुंब आपल्या राहत्या घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. याच संधीचा फायदा घेत दि. 20 सप्टेंबर 2026 रोजी अज्ञात चोरट्याने बंद घराचा दरवाजा तोडून घरात प्रवेश केला. घरातील 53 तोळे सोन्याचे दागिने, पावणेदोन किलो चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. 391/2026, कलम 331(3), 331(4), 3(5) बी.एन.एस. अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान दि. 25 सप्टेंबर 2026 रोजी पोलिसांनी अमर काकासाहेब थोरात (वय 23, रा. क्रांतीनगर, अंबाजोगाई) आणि



जगजीतसिंग अचलसिंग दुधानी (वय 32, रा. शिवाजी चौक, परळी, जि. बीड) यांना अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यातील 27 तोळे (270 ग्रॅम) सोने आणि 858 ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात आले होते.

दरम्यान, या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी मंगलसिंग हिरासिंग बावरी हा गुन्हा करून पसार झाला होता. त्याचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. आरोपीचा बाहेर जिल्ह्यात तसेच बाहेर राज्यात शोध घेण्यात आला. तपासादरम्यान मंगलसिंग बावरी हा बाहेर राज्यातून परळी येथे आपल्या घरी येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे दि. 03 ऑक्टोबर 2026 रोजी पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे व त्यांच्या पथकाने परळी रेल्वे पुलाजवळ गुप्त सापळा रचला. आरोपी मंगलसिंग बावरी तेथे येताच पोलिसांनी शिताफीने त्यास ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता 18 तोळे (187.430 ग्रॅम) सोन्याचे दागिने आणि 743 ग्रॅम चांदीचे दागिने (विट) असा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

या कारवाईमुळे अंबाजोगाई घरफोडी प्रकरणातील चोरीच्या मुद्देमालापैकी आतापर्यंत 45 तोळे सोन्याचे दागिने आणि 1601 ग्रॅम चांदीचे दागिने पोलिसांच्या हाती लागले आहेत. उर्वरित मुद्देमालाबाबत तपास सुरू आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही उल्लेखनीय कामगिरी श्री. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड; श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई; श्री. समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक, बीड; तसेच श्री. ऋषिकेश शिंदे, सहायक पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड (पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर), PSI सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, विष्णु सानप, गोविंद भताने, गोविंद राख, अर्जुन यादव, विकास राठोड, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, अश्वीनकुमार सुरवसे आणि चालक अतुल हराळे यांनी सहभाग घेतला.

## संपादकीय

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला वाघाचा आधार लाभला!

चांदोलीच्या जंगलात तीन वाघ कॅमेऱ्यात कैद झाले तरी त्यांचे वास्तव्य येथे नाही या सत्यावर उपाय शोधत ताडोबा-अंधारी-तून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे 'तारा' या वाघिणीचे हस्तांतर या आठवड्यात झाले. हा दक्षिण महाराष्ट्राच्या जंगलांना मिळालेला नवजीवनाचा श्वास ठरू शकतो. तो तसाच ठरावा ही महाराष्ट्राच्या वन खात्याकडून अपेक्षा आहे. गेली अनेक वर्षे वाघांशिवाय पडझड अनुभवत असलेल्या चांदोली-कोयना पट्ट्याला या एका ऑपरेशनने नवी दिशा दिली आहे. पश्चिम घाटाच्या या दगडी कड्याकपारीत वाघ या शिखर-भक्षकाचा अभाव हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नव्हता, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा तोलच ढासळलेला होता. जंगलाची पुनरुत्पादन क्षमता कमी झाली होती. 'तारा'चे आगमन हा या तुटलेल्या साखळीला पुन्हा एकत्र जोडण्याचा टप्पा आहे. वाघ असल्यावर जंगलातील प्रत्येक प्रजातीला नैसर्गिकरीत्या आपली मर्यादा कळते. त्या त्या प्राण्यांचा वेग, हालचाल आणि जीवनशैली सुधारते आणि त्यामुळे हळूहळू जंगलाची आरोग्यवस्था जोर पकडते. सह्याद्रीचा हा फायदा थेट सातारा, सांगली, कोल्हा-पूर या जिल्ह्यांपर्यंत पोहोचू लागेल. वाघ म्हणजे पर्यटनाचा आत्मा. दशकभरापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या नावाला वैभव होते, पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. पर्यटकां-ना सफारीची भावना असूनही वाघ दिसत नसल्याने चांदोली आणि कोयना पट्टा पर्यटकांच्या यादीत मागे पडत होता. तारा आल्यावर पर्यटकांचा कल पुन्हा जंगलाकडे वळेल, याचा थेट फायदा स्थानिक होमस्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन मार्गदर्शक आणि खाद्यपदार्थ उत्पादकांना होईल. सह्याद्रीत येणारा प्रत्येक पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्थेच्या चक्राला हातभार लावणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांना रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होतात. पर्यावरण शिक्षण, ईको-ट्रेल्स, बर्डिंग गाइड्स, स्थानिक स्वयंसहाय्यता गट यांना यामुळे नवे दार उघडते; परंतु 'तारा'ची गोष्ट फक्त पर्यटनाभोवती फिरत नाही. सह्याद्रीत कोयना, वारणा, कृष्णा खोऱ्यांतील जलस्रोत हे या हिरव्यागार कड्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत. जंगल दाट असेल तर पावसाचे पाणी हळूहळू जमिनीत मुरते आणि पुढे नद्यांना नियमित प्रवाह देत राहते. पण गेल्या काही वर्षांत जंगल नष्ट होत गेल्याने पाण्याची अनियमितता वाढली. सांगली, कोल्हापूरसारख्या जिल्ह्यांमध्ये दरवर्षी पूरस्थिती तीव्र होत गेली. वाघ आल्यावर जंगलातील अतिक्रमण आणि बेकायदेशीर चराईवर प्रशासनाची नजर वाढते. वाघ असलेल्या क्षेत्रात लोक जाणीवपूर्वक सावध राहतात जंगलावर अधिक नियंत्रण ठेवले जाते. यामुळे जलस्रोतांचे दीर्घकालीन संरक्षण होते आणि नैसर्गिक नियंत्रण मिळते. हवामान बदलामुळे पावसाची स्वरूपे अधिक आक्रामक होत असताना अशा स्थिर जंगलाची गरज अधिकच वाढली आहे. या प्रकल्पाचा विस्तारित परिणाम कोकण आणि उत्तर कर्नाटकापर्यंतही जाणवेल. सह्याद्री, अंबोली, दांडेली हा नैसर्गिक प्राणी कॉरिडॉर इतिहा-सात जिवंत होता; पण शहरीकरण, रस्ते, खाणी, विद्युत प्रकल्प यांनी त्याच तुकडे-तुकडे केले. 'तारा'सारखे वाघ स्थलांतरित झाल्यावर या कॉरिडॉरकडे पुन्हा एकदा शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची गरज निर्माण होते. वाघांची ये-जा होत असेल तर हत्ती, गवा, अस्वल, वनकुत्रा यांच्या हालचालीही सुव्यवस्थित राहतात. जैवविविधता फक्त वाघावर अवलंबून नसली तरी वाघ हा त्या विविधतेचा मुख्य सूचक असतो. कोकणातील जंगलांवर खाणकाम किंवा अनियोजित रस्त्यांचे दडपण वाढले की अशा वाघ प्रकल्पांमुळे पर्यावरणीय अनुमतीच्या निकषांत काटेको-रपणा येतो. मात्र या प्रकल्पात धोकेही कमी नाहीत. वाघाला हवा असलेला अखंड जंगल पट्टा आज अनेक भागांत तुटलेला आहे. चांदोली, कोयना, राधानगरीला जोडणारा पट्टा अजूनही अनेक ठिकाणी अरुंद किंवा व्यत्यय आणणारा आहे. गावांची वाढ, व्यावसायिक शेती, जंगल रस्ते या सगळ्यामुळे वाघाला फिरण्यासाठी हवी असलेली शांतता कमी होते.

मानवी-वन्यजीव संघर्षाची शक्यता वाढते. जनावरांवर हल्ले झाले तर स्थानिक लोकांचा विरोध उफाळू शकतो. म्हणूनच जलद आणि सन्मान्य पद्धतीने भरपाई देणारी यंत्रणा, सतत जनजागृती आणि गावकऱ्यांचा थेट सहभाग हे तीन स्तंभ अनिवार्य आहेत, तर दुसरीकडे, सह्याद्रीत शिकार प्राणी पुरेसे नसल्यास वाघ टिकू शकणार नाही. ताडोबात विपुल असलेले सांबर-गवा सह्याद्रीत कमी प्रमाणात दिसतात, त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने त्यांच्या वाढीकडे लक्ष द्यावे लागेल. या सगळ्यांवर शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय इच्छाशक्ती. प्रशासनातील सातत्य नसले तर अशा प्रकल्पाचे भवितव्य धोरण बदलांमध्ये अडकते. तरीही एक गोष्ट निर्विवाद आहे, वाघाचे आगमन म्हणजे निसर्गाचा आत्मविश्वास परत येणे. वाघ असताना जंगलातील वृक्षांचे पुनरुज्जीवन अधिक वेगाने होते, कारण शाकाहारी प्राण्यांचा ताण कमी होतो. दाट जंगलाने कार्बन शोषण वाढते आणि हवामान बदलाचे दडपण कमी करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. झरे आणि ओहोळ पुन्हा जिवंत होतात. पक्षी, साप, कासव, कीटक, औषधी वनस्पती यांची संख्या वाढते. हे सर्व मिळून एक मजबूत परिसंस्था तयार करते आणि ही परिसंस्था हवामान बदलाच्या संकटात माणसाला आधार देणारी सर्वात शक्तिशाली ढाल आहे. ऑपरेशन 'तारा' हे म्हणून केवळ एका वाघिणीचे स्थानांतरण नसून संपूर्ण सह्याद्रीचा पुनर्जन्म आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या पर्यावरणीय आणि आर्थिक भविष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रकल्पाला मिळणारा लोकसह-भाग, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि राजकीय बांधिलकी. वाघाचे पाऊल सातारा, सांगली, कोल्हापूरच्या मातीत पुन्हा उमटले तर तो निसर्गाचा विजय असेल आणि हवामान बदलाच्या अंधाऱ्या भावी दिवसांना तोंड देण्यासाठी या प्रदेशाला वाघाच्या रूपाने मिळालेला सर्वात मोठा मित्र असेल. फक्त तो मित्र जंगलातच राहिला पाहिजे माणसांच्या घरापर्यंत त्याला येऊ न देणे ही जबाबदारी वन विभागाची!

# शिक्षक : समाजाच्या भविष्याचा शिल्पकार: डॉ. राजेंद्र बगाटे

**५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'जागतिक शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. शिक्षणाच्या क्षेत्रात शिक्षकांचे असलेले अनन्यसाधारण योगदान अधोरेखित करण्याबरोबरच शिक्षकांच्या प्रतिष्ठेचा, त्यांच्या कार्यपरिस्थितीचा, शिक्षणाच्या गुणवत्तेचा आणि भावी पिढीच्या जडणघडणीचा गांभीर्याने विचार करण्याचा हा दिवस आहे. शिक्षक म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील धडे शिकविणारी व्यक्ती नव्हे, तर विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा, त्याच्या विचारांना दिशा देणारा आणि समाजाच्या भविष्यातील नागरिकांची निर्मिती करणारा महत्त्वाचा घटक होय. एका शिक्षकाच्या कार्याचा परिणाम एका वर्गापुरता किंवा एका शैक्षणिक वर्षापुरता मर्यादित राहत नाही. त्याच्या शिकवणीचा प्रभाव विद्यार्थ्याच्या संपूर्ण आयुष्यावर आणि त्यामार्फत कुटुंब, समाज व राष्ट्राच्या विकासावर पडत असतो. म्हणूनच शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यवसायाचा सन्मान नसून ज्ञान, शिक्षण, संस्कार आणि सामाजिक परिवर्तनाच्या शक्तीचा सन्मान आहे.**



जागतिक शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांच्या कार्याचा विचार करताना शिक्षणाचा व्यापक अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षण म्हणजे केवळ वाचन, लेखन, गणित किंवा विविध विषयांचे ज्ञान आत्मसात करणे नव्हे. शिक्षण व्यक्तीला स्वतःचा विचार करण्याची, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची, प्रश्न विचारण्याची, निर्णय घेण्याची आणि समाजाप्रती जबाबदारी स्वीकारण्याची क्षमता देते. या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विद्यार्थी किती माहिती लक्षात ठेवतो यापेक्षा तो मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग जीवनात कसा करतो, समस्या कशा सोडवतो, इतरांशी कसा वागतो आणि समाजाच्या हितासाठी काय योगदान देतो, याला आज अधिक महत्त्व आहे. त्यामुळे शिक्षक हा ज्ञानाचा केवळ प्रसारक न राहता विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाचा मार्गदर्शक बनला पाहिजे.

भारतीय समाजात शिक्षकाला ऐतिहासिकदृष्ट्या विशेष स्थान प्राप्त झाले आहे. गुरु-शिष्य परंपरेपासून आधुनिक शिक्षणव्यवस्थेपर्यंत शिक्षकाची भूमिका सातत्याने बदलत आली आहे. पूर्वी शिक्षकाकडे ज्ञानाचा प्रमुख स्रोत म्हणून पाहिले जात होते. विद्यार्थी ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षकाकडे जात असे. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे ज्ञानाचे अनेक स्रोत विद्यार्थ्यांच्या हातात आले आहेत. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, डिजिटल ग्रंथालये, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि विविध शैक्षणिक व्यासपीठांमुळे काही क्षणांत प्रचंड माहिती उपलब्ध होते. अशा परिस्थितीत शिक्षकाची गरज संपली नसून त्याची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. माहिती आणि ज्ञान यांतील फरक विद्यार्थ्याला समजावून सांगणे, उपलब्ध माहितीची सत्यता तपासण्याची सवय लावणे आणि ज्ञानाचा विवेकपूर्ण उपयोग करण्यास प्रवृत्त करणे हे आजच्या शिक्षकाचे महत्त्वाचे कार्य आहे.

तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे बदलत्या साधनांशी स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे. डिजिटल शिक्षणामुळे वर्गखोलीची पारंपरिक सीमा विस्तारली आहे. प्रत्यक्ष वर्गाबरोबर ऑनलाइन अध्यापन, ध्वनिचित्रफिती, आंतरक्रियात्मक सामग्री, आभासी प्रयोगशाळा आणि डिजिटल मूल्यमापनाच्या पद्धती वापरल्या जात आहेत. मात्र तंत्रज्ञानाचा वापर हा शिक्षणाचा उद्देश नसून शिक्षण अधिक परिणामकारक करण्याचे साधन आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान विद्यार्थ्याला माहिती देऊ शकते; परंतु त्याला संवेदनशील, जबाबदार आणि विवेकी नागरिक बनविण्याचे कार्य मानवी शिक्षकच प्रभावीपणे करू शकतो. विद्यार्थ्याच्या मनातील संभ्रम ओळखणे, त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे, अपयशातून पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याला माणुसकीची जाणीव करून देणे या गोष्टी कोणतेही तंत्रज्ञान पूर्णपणे करू शकत नाही.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे शिक्षणक्षेत्रासमोर नवे प्रश्न उभे राहिले आहेत. विद्यार्थ्यांना लेखन, माहिती संकलन, भाषांतर, गणना आणि विविध शैक्षणिक कामांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने सहज उपलब्ध होत आहेत. या बदलाकडे केवळ धोका म्हणून पाहण्याऐवजी त्याचा जबाबदारीने वापर कसा करायचा, हे विद्यार्थ्यांना शिकविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांची स्वतः विचार करण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि चिकित्सक दृष्टी कमी होणार नाही, याची काळजी शिक्षकाने घेतली पाहिजे. तयार उत्तर स्वीकारण्यापेक्षा प्रश्न समजून घेणे, उपलब्ध उत्तरांची चिकित्सा करणे आणि स्वतःचे स्वतंत्र मत विकसित करणे याला शिक्षणात महत्त्व दिले पाहिजे. त्यामुळे भविष्यातील शिक्षक हा तंत्रज्ञानविरोधी नसून तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करणारा आणि विद्यार्थ्यांना त्याचे नैतिक भान देणारा असणे आवश्यक आहे.

शिक्षणाचे आणखी एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे मूल्यांची जडणघडण. ज्ञान आणि कौशल्ये आवश्यक असली तरी त्यांना नैतिक मूल्यांची जोड नसेल तर शिक्षण अपूर्ण राहते. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सहिष्णुता, सामाजिक संवेदनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. समाजात विविध जाती, धर्म, भाषा, प्रदेश, आर्थिक स्तर आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले लोक एकत्र राहतात. या विविधतेचा आदर करत सहजीवनाची भावना निर्माण करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. शिक्षक स्वतः आपल्या वर्तनातून समानता आणि सहिष्णुतेचा आदर्श निर्माण करत असेल, तर त्याचा विद्यार्थ्यांवर अधिक प्रभाव पडतो. कारण विद्यार्थ्यांना शिक्षकाचे बोलणे जितके महत्त्वाचे वाटते, तितकेच त्याचे आचरणही महत्त्वाचे वाटते.

सामाजिक विषमता कमी करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. मात्र शिक्षणव्यवस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळतेच असे नाही. ग्रामीण, आदिवासी, भटक्या-विमुक्त, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दिव्यांग आणि विविध कारणांमुळे वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसमोर अनेक अडचणी असतात. अशा विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकाने संवेदनशील भूमिका बजावली पाहिजे. विद्यार्थ्याच्या आर्थिक परिस्थितीवरून त्याच्या क्षमतेचा अंदाज बांधणे किंवा त्याला कमी लेखणे हे शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांना विरोधी आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही क्षमता असते. त्या क्षमतेला योग्य दिशा देणे आणि आत्मविश्वास निर्माण करणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक ग्रामीण आणि दुर्गम भागांत आजही शैक्षणिक साधनसुविधा, डिजिटल सुविधा, वाहतूक आणि इतर पायाभूत सोयींच्या मर्यादा आहेत. काही विद्यार्थ्यांना कौटुंबिक आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडावे लागते, तर काही विद्यार्थ्यांवर घरकाम, शेती किंवा इतर जबाबदाऱ्यांचा भार असतो. अशा परिस्थितीत शिक्षक केवळ अध्यापन करणारा राहत नाही; तो विद्यार्थ्याच्या कुटुंबाशी संवाद साधणारा, पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारा आणि विद्यार्थ्याला शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणारा सामाजिक घटक बनतो. ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात शिक्षकाचे योगदान त्यामुळे विशेष अधोरेखित होते.

मुलींच्या शिक्षणाच्या संदर्भातही शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या सामाजिक मानसिकतेविरुद्ध जनजागृती करण्याचे काम शिक्षक करू शकतो. मुलींच्या शिक्षणामुळे केवळ एका व्यक्तीचा विकास होत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढ्यांच्या जीवनमानावर त्याचा परिणाम होतो. शिक्षित मुलगी स्वतःचे निर्णय अधिक सक्षमपणे घेऊ शकते, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळवू शकते आणि सामाजिक प्रश्नांबाबत अधिक जागरूक होऊ शकते. त्यामुळे शिक्षकाने वर्गातील प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्याकडे समान क्षमतेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. लिंगभेदमुक्त शिक्षण ही समताधिष्ठित समाजनिर्मितीची पूर्वअट आहे.

आजच्या विद्यार्थ्यांसमोर मानसिक ताणाचे प्रश्नही वाढत आहेत. परीक्षेतील स्पर्धा, गुणांची अपेक्षा, करिअरची चिंता, कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांच्या भावनिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत शिक्षकाने विद्यार्थ्याच्या गुणांपेक्षा त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्याच्या अडचणी समजून घेणे आणि गरजेनुसार योग्य मार्गदर्शन करणे हे शिक्षकाच्या कार्याचा महत्त्वाचा भाग बनत आहे. प्रत्येक विद्यार्थी सारख्याच पद्धतीने शिकत नाही आणि प्रत्येकाचे यशही एकाच मापाने मोजता येत नाही. विद्यार्थ्याच्या क्षमतेचा शोध घेऊन त्याला योग्य संधी देणे ही शिक्षणाची खरी कसोटी आहे.

शिक्षकाच्या कार्याचा विचार करताना त्याच्या स्वतःच्या कार्यपरिस्थितीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शिक्षकाकडून गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना त्याला आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, तंत्रज्ञान, वेळ आणि शैक्षणिक स्वायत्तता मिळणे आवश्यक आहे. सतत बदलणारा अभ्यासक्रम, विविध शैक्षणिक उपक्रम, प्रशासकीय कामकाज आणि तंत्रज्ञानातील बदल यामुळे शिक्षकावर अतिरिक्त जबाबदाऱ्या येतात. शिक्षकाचा वेळ मुख्यतः विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी आणि शैक्षणिक विकासासाठी वापरला गेला पाहिजे. शिक्षकाला सन्मानाची आणि विश्वासाची वागणूक मिळाली तर त्याच्या सर्जनशीलतेला चालना मिळते. शिक्षकाचा दर्जा उंचावणे म्हणजे शिक्षणाचा दर्जा उंचावणे होय.

शिक्षकाने स्वतःही आयुष्यभर विद्यार्थी राहण्याची तयारी ठेवली पाहिजे. जग सतत बदलत आहे. नवीन ज्ञान, नवीन तंत्रज्ञान, नवीन सामाजिक प्रश्न आणि नवीन अध्यापनपद्धती सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे एकदा शिक्षण पूर्ण केले की शिक्षकाचे शिकणे संपते, अशी कल्पना कालबाह्य झाली आहे. शिक्षकाने वाचन, संशोधन, प्रशिक्षण, चर्चासत्रे आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीतून स्वतःचे ज्ञान सतत समृद्ध केले पाहिजे. स्वतः शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची जिज्ञासा निर्माण करू शकतो. शिक्षण ही स्थिर प्रक्रिया नसून सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे, याची जाणीव शिक्षक आणि शिक्षणव्यवस्था या दोघांनाही असणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय संकटांच्या काळात शिक्षकाची सामाजिक जबाबदारी आणखी वाढली आहे. हवामानबदल, पाण्याची कमतरता, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या प्रश्नांचा परिणाम भावी पिढ्यांवर होणार आहे. विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी केवळ पुस्तकातील माहिती देणे पुरेसे नाही; पर्यावरणपूरक जीवनशैलीची सवय लावणे आवश्यक आहे. पाणी वाचविणे, ऊर्जा बचत करणे, वृक्षसंवर्धन करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेकपूर्ण वापर करणे या सवयी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजात रुजविता येतात. अशा प्रकारे शिक्षक वर्गखोलीच्या पलीकडे जाऊन सामाजिक आणि पर्यावरणीय परिवर्तनाचा वाहक बनतो.

शिक्षक हा लोकशाही समाजाच्या निर्मितीतही महत्त्वाची भूमिका बजावतो. लोकशाही केवळ मतदानाची व्यवस्था नसून विचारस्वातंत्र्य, मतभिन्नतेचा आदर, संवाद, समानता आणि जबाबदारी यांवर आधारित जीवनपद्धती आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, आपले मत मांडण्याची आणि दुसऱ्याचे मत ऐकण्याची संधी देणारी वर्गखोली ही लोकशाही संस्कारांची पहिली प्रयोगशाळा ठरू शकते. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन दिले आणि मतभिन्नतेचा आदर केला तर त्यातून चिकित्सक आणि जबाबदार नागरिक घडू शकतात. समाजात वाढणाऱ्या असहिष्णुतेला उत्तर देण्यासाठी विवेकशील आणि संवादक्षम पिढी निर्माण करणे ही आजची मोठी गरज आहे.

खऱ्या अर्थाने शिक्षकाचा प्रभाव त्याने किती धडे शिकविले यापेक्षा त्याने किती विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला यावर मोजला पाहिजे. एखाद्या विद्यार्थ्याला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला शिकविणे, अपयशानंतर पुन्हा प्रयत्न करण्याची प्रेरणा देणे, चुकीतून शिकण्याची तयारी निर्माण करणे किंवा समाजातील इतरांविषयी संवेदनशीलता निर्माण करणे ही शिक्षकाच्या कार्याची मोठी फलश्रुती आहे. शिक्षकाचे एखादे वाक्य, एखादा सल्ला किंवा एखाद्या क्षणी दिलेला आधार विद्यार्थ्याच्या संपूर्ण आयुष्याला दिशा देऊ शकतो. म्हणून शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून भविष्य घडविणारा व्यक्ती असतो.

आज शिक्षणव्यवस्थेकडे केवळ रोजगारनिर्मितीच्या साधनाच्या दृष्टीने पाहण्यापेक्षा मानवी विकासाचे माध्यम म्हणून पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये मिळाली पाहिजेत; परंतु त्याचबरोबर त्यांच्यात सामाजिक जबाबदारी, नैतिक जाणीव, सर्जनशीलता, सहकार्याची भावना आणि मानवी मूल्येही विकसित झाली पाहिजेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर माणुसकीची प्रगतीही झाली पाहिजे. या दोन्हींचा समतोल साधण्याचे काम शिक्षक करू शकतो. म्हणूनच आधुनिक शिक्षणव्यवस्थेत शिक्षकाचे स्थान केवळ अध्यापनापुरते मर्यादित न ठेवता समाजनिर्मितीच्या व्यापक प्रक्रियेत मान्य केले पाहिजे.

जागतिक शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा केवळ औपचारिक दिवस नसून शिक्षण आणि शिक्षक यांच्या भविष्याचा विचार करण्याचा दिवस आहे. शिक्षकांचा सन्मान हा एका दिवसापुरता मर्यादित न राहता त्यांच्या कार्याला समाजात योग्य प्रतिष्ठा, शिक्षणाला आवश्यक साधने आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यात प्रतिबिंबित झाला पाहिजे. शिक्षकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे, त्यांना सतत प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, नव्या तंत्रज्ञानाशी परिचित करून देणे आणि अध्यापनासाठी आवश्यक स्वायत्तता देणे ही शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आवश्यक पावले आहेत.

५ ऑक्टोबरचा जागतिक शिक्षक दिन आपल्याला हेच स्मरण करून देतो की राष्ट्राची खरी उभारणी केवळ भव्य इमारती, आधुनिक तंत्रज्ञान किंवा आर्थिक प्रगतीतून होत नाही; ती विचारशील, संवेदनशील, कर्तव्यदक्ष आणि विवेकी नागरिकांच्या निर्मितीतून होते. अशा नागरिकांच्या निर्मितीची प्रक्रिया वर्गखोलीत सुरू होते आणि तिच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. काळ बदलला, अध्यापनाची साधने बदलली, ज्ञान मिळविण्याचे मार्ग बदलले आणि तंत्रज्ञान अधिक सामर्थ्यवान झाले, तरी विद्यार्थ्याला समजून घेणारा, त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवणारा आणि त्याला माणूस म्हणून घडविणारा शिक्षक कालातीत राहणार आहे. म्हणून शिक्षकाचा खरा सन्मान हा एका दिवसाच्या अभिनंदनात नसून प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उज्ज्वल भविष्य देण्याच्या सामूहिक प्रयत्नांत आहे. शिक्षक हा केवळ आजचा अध्यापक नसतो; तो उद्याच्या समाजाचा शिल्पकार असतो. म्हणूनच शिक्षकाचा सन्मान म्हणजे शिक्षणाचा सन्मान आणि शिक्षणाचा सन्मान म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान होय.

**■ डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# छत्तीसगड महिला आयोगाच्या राज्याध्यक्षा डॉ. ममता साहू यांचा तेली समाजाच्या वतीने सत्कार

**■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

छत्तीसगड राज्य महिला आयोगाच्या राज्याध्यक्षा तथा कॅबिनेट मंत्री दर्जा असलेल्या डॉ. ममता साहू यांनी परळी वैजनाथ येथे प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. यानंतर तेली समाजाच्या वतीने त्यांना श्री शनी मंदिर येथे निमंत्रित करून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी महामंडलेश्वरी यामिनी देवीजी यांचाही तेली समाजाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

डॉ. ममता साहू या प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी परळी येथे आल्या असता महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेतली. समाजाच्या वतीने आयोजित या सत्कार सोहळ्यात त्यांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच महामंडलेश्वरी यामिनी देवीजी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, श्री शनी मंदिर देवस्थानचे व्यवस्थापक चंद्रकांत उदगीरकर, नांदेड विभागाध्यक्ष प्रा. प्रविण फुटके, तालुकाध्यक्ष मनोज जठार, शनैश्वर प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवशंकर जठार, शिवम सुपर शॉपीचे संचालक वैजनाथ कोल्हे, नवगण महाविद्यालयाचे कार्यालयीन प्रमुख नरेश साखरे, चंद्रशेखर फुटके, शिवराज सोनटक्के, अनिल बेंडे, सोमनाथ वाघमारे, दीपक साखरे, प्रसाद जठार यांच्यासह तेली समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभू वैद्यनाथाच्या पावन नगरीत छत्तीसगड राज्य महिला आयोगाच्या राज्याध्यक्षा डॉ. ममता साहू यांचा तेली समाजाच्या वतीने करण्यात आलेला हा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून परळी विधानसभा मतदारसंघ विशेष सखोल पुनरीक्षण (S.I.R.) अभियानासाठी समन्वयकांची नियुक्ती

परळी : प्रतिनिधी

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एस.आय.आर.) कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार विधानसभा मतदारसंघ निहाय समन्वयकांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये बीड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या २३३ – परळी विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने एकूण चार प्रमुख समन्वयकांची नियुक्ती केली आहे.एस.आय.आर संदर्भात पक्षाची परळी मतदारसंघाची जबाबदारी पुढील नेत्यांवर सोपवण्यात आली आहे.
श्री. राजाभाऊ पौळ ( परळी तालुका ) ,श्री. राजाभाऊ औताडे (अंबाजोगाई ग्रा.),ॲड. गोविंद फड (परळी ता.),श्री. बाजीराव धर्माधिकारी (परळी शहर), या सर्व समन्वयकांवर आगामी काळात परळी विधानसभा क्षेत्रात मतदार याद्यांचे अचूक सक्षमीकरण करणे, नवीन मतदारांची नोंदणी आणि विशेष पुनरीक्षण अभियान यशस्वीपणे राबवण्याची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निवडी बद्दल माजी मंत्री तथा परळी विधान सभा आमदार धंनजय मुंडे यांनी अभिनंदन करत शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.





# आष्टीत अवैध दारू विक्रीसह जुगारावर पोलिसांची धडक कारवाई; ४ गुन्हे दाखल

## जुगाराच्या ठिकाणाहून २७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल, तर तीन ठिकाणच्या दारू विक्रीत १७ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त

आष्टी प्रतिनिधी :

आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना अवैध दारू विक्री आणि जुगाराविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत चार गुन्हे दाखल केले आहेत. २ ऑक्टोबर रोजी दिवसभर करण्यात आलेल्या या कारवाईत जुगाराच्या ठिकाणाहून रोख रक्कम, पत्ते व मोबाईल असा २७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल, तर तीन ठिकाणी सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीत एकूण १७ हजार ९१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आष्टी शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे काही इसम गोलाकार बसून पैशांवर तिरट नावाचा पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची माहिती प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांना मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघमारे व पोलीस कर्मचाऱ्यांनी पंचांसह दुपारी १२.५० वाजता छापा टाकला. यावेळी सादिक शब्बीर शेख, बाळू साहेबराव वाघमारे, पंकज रघुनाथ साबळे, बाबासाहेब गंगाराम शिकारे आणि हरीभाऊ श्रीपती अनारसे, सर्व रा. केरूळ, ता. आष्टी, यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

यानंतर चोभा निमगाव शिवारातील कडा-मिरज रस्त्यालगत असलेल्या हॉटेल काळेश्वरी येथे विनापरवाना देशी-विदेशी दारूची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सायंकाळी ६.३० वाजता छापा टाकला. या कारवाईत ५ हजार १०० रुपयांची दारू जप्त करून सुरज सुभाष मुरकुटे (वय २५, रा. चोभा निमगाव) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

तसेच नांदा शिवारातील नांदा मळा येथील हॉटेल रानवारा येथे विनापरवाना देशी-विदेशी दारू विक्री सुरू असल्याचे आढळून आले. पोलिसांनी सायंकाळी ७.५० वाजता केलेल्या कारवाईत ११ हजार ५६० रुपयांची दारू जप्त केली. याप्रकरणी राजेंद्र बापुराव काळे (वय ५६, रा. फत्तेवडगा, ता. आष्टी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मांडवा येथील विराज किराणा दुकानातही विनापरवाना देशी दारूची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सायंकाळी ६.३० वाजता छापा टाकून १ हजार २५० रुपयांची देशी दारू जप्त केली. याप्रकरणी सचिन नवनाथ मुटकुळे (वय २०, रा. मांडवा, ता. आष्टी) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्री करणारे हॉटेल व धाबे चालक तसेच पत्ते, जुगार व मटका खेळणाऱ्यांची गोपनीय माहिती घेऊन यापुढेही कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत खुळे आणि प्रभारी अधिकारी भारत पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



# लोकार्थ

## जीजेसीच्या इंडियाचा जेम अँड ज्वेलरी शो च्या 10व्या आवृत्तीचा शुभारंभ

ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल (जीजेसी) ने अभिमानाने इंडिया जेम अँड ज्वेलरी शो (जीजेएस 2026 दिवाळी एडिशन) च्या 10व्या आवृत्तीचे उद्घाटन केले. #HumaraApnaShow म्हणून साजरा होणारा हा भारतातील सर्वात प्रीमियम बी2बी ज्वेलरी प्रदर्शन मुंबई येथे सुरू झाला असून या शोमध्ये देश-विदेशातील ज्वेलर्स, डिझाइनर्स, खरेदीदार आणि उद्योग नेते एकत्र येणार आहेत. भव्य उद्घाटन सोहळ्याला मुख्य अतिथी श्री. उदय सामंत जी, उद्योग व मराठी भाषा मंत्री, महाराष्ट्र शासन उपस्थित होते. तसेच गेस्ट ऑफ ऑनर श्री. श्रीनिवास इन्जेटी, चेअरमन, IAGES; श्री. महेश जैन, अध्यक्ष, यूपी सराफा असोसिएशन; आणि विशेष अतिथी श्री. राजीव जैन, चेअरमन, JJS उपस्थित होते. या कार्यक्रमाला श्री. राजेश रोकडे, चेअरमन जीजेसी; श्री. अविनाश गुप्ता, उपाध्यक्ष जीजेसी; श्री. सैय्यम मेहरा, संयोजक जीजेएस व माजी चेअरमन जीजेसी तसेच जीजेसी कमिटी ऑफ अॅडमिनिस्ट्रेशनचे सदस्य आणि इतर वरिष्ठ उद्योग नेते उपस्थित होते. या उपस्थितीने भारताच्या ज्वेलरी उद्योगातील सामूहिक ताकद आणि एकतेचे दर्शन घडवले.या शोमध्ये विविध उत्पादन श्रेणींचा समावेश असेल—सोन्या-चांदीचे दागिने, कुट्युर आणि हिरेजडित दागिने, सैल हिरे, रत्न व मोती, लॅब ग्रोन हिरे व दागिने, तसेच allied व मशिनरी. GJS हा भारताच्या 5,000 वर्षांच्या दागिन्यांच्या वारशाला अभिवादन आहे, तसेच नवकल्पना, कारागिरी आणि उत्कृष्टतेची नवी परंपरा सादर करतो.




## गांधी जयंतीनिमित्त, खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांवर देशव्यापी सवलत

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या 'हर घर स्वदेशी, घर-घर स्वदेशी' आणि 'व्होकल फॉर लोकल' या आवाहनाला नवी ऊर्जा देण्यासाठी, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाच्या खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष श्री मनोज गोयल यांनी ग्रामोद्योग भवन, ग्राम शिल्प एम्पोरियम येथे खादी उत्पादने खरेदी केली आणि देशव्यापी विशेष सवलत विक्री सुरू केली. याप्रसंगी त्यांनी खादी आणि ग्रामोद्योग उत्पादने खरेदी केली आणि UPI द्वारे डिजिटल पेमेंट केले. गांधी जयंतीनिमित्त कनॉट प्लेस येथील शोरूममध्ये अनेक मान्यवरांनी खरेदी केली

खादी व्हीआयसीच्या अध्यक्षांनी माहिती दिली की, गांधी जयंतीनिमित्त नवी दिल्लीतील कनॉट प्लेस येथील खादी भवनसह देशभरात एक विशेष सवलत मोहीम सुरू करण्यात आली आहे. ही सवलत २ ऑक्टोबर ते १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत उपलब्ध असेल. या कालावधीत खादी उत्पादनांवर २० टक्क्यांपर्यंत आणि ग्रामोद्योग उत्पादनांवर १० टक्के सवलत मिळेल. आज, आत्मनिर्भर भारत, व्होकल फॉर लोकल, लोकल टू ग्लोबल आणि डेव्हलप्ड इंडिया-२०४७ या संकल्पांची पूर्तता करण्यासाठी खादी एक शक्तिशाली माध्यम बनत आहे.



## डीएचएल एक्सप्रेसची भारतात 8.9% शुल्क वाढीची घोषणा

जगातील आघाडीचा इंटरनॅशनल एक्सप्रेस सर्व्हिसेस प्रोव्हायडर डीएचएल एक्सप्रेसने भारतात शुल्क वाढीची घोषणा केली. 1 जानेवारी 2027 पासून लागू होतील. भारतात ही वाढ 8.9% असेल."इंटरनॅशनल ट्रेड व्यवसायांसाठी नवीन संधी निर्माण करत राहतो, तर सप्लाय चेन सतत जास्त आंतरजोडलेल्या आणि गुंतागुंतीच्या होत चालल्या आहेतडीएचएल एक्सप्रेस दरवर्षी आपल्या किंमतींमध्ये अॅडजस्टमेंट करते जेणेकरून महागाईचे दबाव, चलनातील चढ-उतार आणि उद्योगाशी संबंधित कॉस्ट डेव्हलपमेंट्स विचारात घेतले जाऊ शकतील.

220 पेक्षा जास्त देश आणि प्रदेशांमध्ये काम करणारा इंटरनॅशनल स्तरावर एकात्मिक व्यवसाय म्हणून, डीएचएल एक्सप्रेसवर केवळ स्थानिक आर्थिक परिस्थितीचा परिणाम होत नाही, तर ग्लोबल मार्केटमधील बदलांचाही परिणाम होतो. महागाईशिवाय, कंपनीच्या कॉस्ट स्ट्रक्चरवर एनर्जी कॉस्ट, कंप्लायन्स रिक्वायरमेंट्स आणि नॅशनल व इंटरनॅशनल अथॉरिटीजद्वारे लागू केलेल्या बदलत्या कस्टम, रेग्युलेटरी आणि सिक्युरिटी उपायांशी संबंधित अॅडमिनिस्ट्रेटिव्ह खर्चांसारख्या घटकांचा परिणाम सुरू आहे. अनेक देशांमधील लेबर मार्केटचे सततचे दबावही ऑपरेशनल कॉस्ट वाढवण्यात योगदान देतात.

## शिकागो न्यूमॅटिकचा नवीन पोर्टेबल एअर कॉम्प्रेसर

शिकागो न्यूमॅटिक इंडियाने त्यांचा नवीन CPS 950-300 पोर्टेबल एअर कॉम्प्रेसर प्रस्तुत केला आहे, जो वॉटरवेल, मायनिंग आणि सोलर फाऊंडेशन ड्रिलिंगच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केला आहे. उत्कृष्ट एअर डेलिव्हरी, इंधन बचत आणि कामातील लवचिकता एकत्र करून, हा कॉम्प्रेसर कंत्राटदारांना अधिक खोलवर ड्रिल करण्यास, प्रकल्प जलद पूर्ण करण्यास आणि नफा वाढवण्यास मदत करण्यासाठी डिझाइन केला आहे.ड्रिलिंग उद्योगात कंत्राटदारांना अधिक खोलवर ड्रिलिंगच्या गरजा, कठीण आणि बदलत्या जमिनीच्या परिस्थिती, खालावलेली भूजल पातळी, वाढता खर्च आणि प्रकल्पाच्या वेळेच्या कडक मर्यादा यांचा सामना करावा लागत असल्याने कामाचा ताण वाढताना दिसत आहे.

त्याच वेळी, सोलर इन्फ्रास्ट्रक्चरच्या विकासात झालेल्या वाढीमुळे मोठ्या प्रमाणावर फाऊंडेशन ड्रिलिंगची मागणी वाढली आहे, ज्यामुळे उत्पादकता, अचूकता आणि विश्वासार्हता पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे.

संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, सोमवार , 05 ऑक्टोबर 2026

Last page





# अनधिकृत पाणी उपशावर धडक कारवाई

परळी : प्रतिनिधी

परळी तालुक्यातील नंदनज येथील बोरना मध्यम प्रकल्पातून होत असलेल्या अनधिकृत पाणी उपशावर तहसील प्रशासनाने धडक कारवाई केली आहे. सध्या या प्रकल्पात केवळ १७ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असल्याने प्रशासनाने पाणीसाठ्याच्या संरक्षणासाठी कठोर भूमिका घेतली आहे.

नंदनजसह कासारवाडी, मिरवट, सारडगाव, मांडवा आणि मरळवाडी परिसरासाठी बोरना प्रकल्प हा महत्त्वाचा जलस्रोत आहे. मात्र, या प्रकल्पातून अनधिकृतपणे पाणी उपसा होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकाने कारवाई केली.

कारवाईदरम्यान अनधिकृत पाणी उपशासाठी वापरण्यात येणाऱ्या मोटारी आणि पंप बंद करण्यात आले, तर संबंधित डीपी बंद करून खाली काढण्यात आली. त्यामुळे अनधिकृत पाणी उपशाला आळा बसला आहे. दरम्यान, बोरना प्रकल्पासह परळी तालुक्यातील कोणत्याही जलस्रोतामधून अनधिकृत पाणी उपसा करताना आढळल्यास मोटारी, पंप आणि वीज जोडण्यांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात फौजदारी कारवाई केली जाईल, असा इशारा तहसीलदार विनोद रनवरे यांनी दिला आहे.

पिण्याच्या पाण्याचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाकडून जलस्रोतांवर सातत्याने नजर ठेवण्यात येणार असल्याने, अनधिकृत पाणी उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



# बीडचे जनसंपर्क कार्यालय प्रत्यक्ष जनसेवेत रूजू ; ना . पंकजाताई मुंडेंचा पहिलाच 'जनता दरबार' हाऊसफुल्ल

बीड प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी शहरात नव्यानेच सुरू केलेले जनसंपर्क कार्यालय आज प्रत्यक्ष जनसेवेत रूजू झाले आहे. ना. पंकजाताईंनी घेतलेला पहिलाच 'जनता दरबार' हाऊसफुल्ल झाला. प्रत्येकांची समोरासमोर भेट आणि समस्यांचा जागेवरच निपटारा झाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. बीडसह गेवराई, आष्टी,पाटोदा, शिरूर कासार, वडवणी आदी तालुक्यातील जनतेची गर्दी यावेळी पहायला मिळाली.

शहरातील तहसील कार्यालयासमोरील साधना अव्हेन्यू व्यापारी संकुलात हे जनसंपर्क कार्यालय सुरू करण्यात आले असून मागील आठवड्यात याचे लोकार्पण झाले होते. ना. पंकजाताई मुंडे आज दुष्काळाची पाहणी करण्यासाठी आल्या होत्या, तत्पूर्वी त्यांनी दुपारी जनसंपर्क कार्यालयात येऊन सुमारे चार तास जनता दरबार घेऊन जनतेच्या समस्या, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेतली आणि समस्यांचे जागेवरच निराकरण केले. सर्व सामान्य माणसापासून ते राजकीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यां पर्यंत सर्वांचे प्रश्न त्यांनी समजून घेतले.

या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना लगेच फोन करून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला.

### फेस टू फेस संवाद

जनता दरबारात ना. पंकजाताई मुंडे आलेल्या प्रत्येकाची समस्या नीट ऐकून घेत त्यावर लगेच तोडगा काढून फोन करतात, त्यांची ही शैली पाहून आपल्या समस्यांची गाऱ्हाणी घेऊन आलेल्या जनतेच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटत होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं, फोन केला, आमचं काम झालं,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. काही नागरिकांनी सांगितलेले काम झाल्याबद्दल पेढे घेऊन ना. पंकजाताईंचे आभार देखील यावेळी मानले.

# संत तुकाराम विद्यालयात शिक्षक ज्ञानोबा गडदे यांचा थाटात सेवापूर्ती सत्कार सोहळा संपन्न

परळी प्रतिनिधी

संत तुकाराम विद्यालय, नागापूर कॅम्प येथे 33 वर्ष सेवा झालेले जेष्ठ शिक्षक श्री. ज्ञानोबा (माऊली ) गडदे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा व विद्यार्थी पालक मेळावा अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. वसंतराव नाईक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. टी.पी.मुंडे सरांच्या व शाळेच्या वतीने गडदे सरांना आहेर, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पहार घालून गौरवण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्री. भिसराम राठोड, मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष कॉ. पी. एस. घाडगे, राज्य सचिव बंडू आघाव, मस्कले सर, नागपूरचे सरपंच रमेश आप्पा तोंडारे, परचुंडीचे सरपंच नावंदे, उपसरपंच संतोष सोळंके, नागापूर केंद्रीय कन्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. राठोड , माजी सैनिक युवराज देवकते, वैद्यनाथ बँकेचे जनरल मॅनेजर खंदाडे , ॲड. माऊली मुंडे, औद्योगिक ग्रामीण आयटीआयचे प्राचार्य घुगे , दौनापूर बालाघाट विद्यालयाचे मुख्याध्यापक मुरलीधर कराड, टोकवाडी रत्नेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश किलचे,संत तुकाराम विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक शंकर सोळंके तसेच परिसरातील शिक्षकवृंद आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक नरहरी मुंडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. संदीपान मुंडे यांनी करून दिला, तर सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक अनंत सलगर यांनी केले. शेवटी शाळेचे शिक्षक सतीश तूपसमुद्रे यांनी सर्वांचे आभार मानले.




# तपोवन येथील वीर सुपुत्रांचा सेवापूर्ती सन्मान सोहळा आणि विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न !

सिरसाळा प्रतिनिधी

देशसेवेचे कर्तव्य यशस्वीरीत्या पूर्ण करून गावी परतलेल्या तपोवन येथील दोन वीर सुपुत्रांचा भव्य सेवापूर्ती सन्मान सोहळा आणि गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात पार पडला. परळी वैजनाथ तालुक्यातील तपोवन येथे शनिवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२६ रोजी या दैदिप्यमान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय सैन्याच्या युनिट ७६ आर्मड रेजिमेंट मध्ये देशसेवा बजावलेले श्री. महादेव ज्ञानेश्वर कणसे आणि एएमसी सेंटर अँड कॉलेज, लखनऊ येथून सेवानिवृत्त झालेले श्री. आदिनाथ ज्ञानोबा कराड या तपोवनच्या दोन भूमिपुत्रांनी दीर्घकाळ केलेल्या खडतर देशसेवेबद्दल संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमापूर्वी सकाळी १० वाजता तपोवन पाटी ते महादेव मंदिर दरम्यान या वीर सैनिकांची ढोल-ताशांच्या गजरात आणि फुलांच्या वर्षावात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर 'भारत माता की जय' च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. याच सोहळ्याचे औचित्य साधून देशरक्षकांसोबतच गावातील शिक्षणाची ज्योत



पेटवणाऱ्या आणि विविध परीक्षांमध्ये घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये जिल्हा परिषद सातारा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. परमेश्वर कांदे, छत्रपती संभाजीनगर येथील अभियंता वैभव कराड, नीट परीक्षेत ५३० गुण मिळवणारा पियुष कराड, ५४८ गुण मिळवणारा शुभम कराड, एमएचटी-सीईटी पीसीएम गटामध्ये ८२.८३ टक्के मिळवणारा विजय कराड, पोलीस पाटील विठ्ठल पांचाळ आणि आयटीबीपी मध्ये निवड झालेले अविनाश गायकवाड यांचा समावेश होता.

या गौरव सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार श्री. व्यंकटराव कदम साहेब हे होते. शिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. बाबासाहेब राठोड साहेब उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून के.एस. के. महाविद्यालय बीडचे कॅप्टन डॉ. बाळासाहेब पोटे यांनी उपस्थितांना सैनिकी सेवा आणि देशसेवेचे महत्त्व पटवून देत मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. पंडित गुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा चे प्राचार्य श्री. ए. व्हि. जाधव सर, संचालक श्री. सुरेश आबा कराड, मुख्याध्यापक श्री. विठ्ठल लहाने सर, मुख्याध्यापक श्री. बाळासाहेब गिते सर आणि ज्ञानदिप अकॅडमीचे श्री. दत्ता दराडे सर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.